८.००
२८.०७.२३

# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

दिनांक : २७/०७/२०२३

## प्रसिध्दी पत्रक (प्रेसनोट)

दिनांक २५/०७/२०२३ रोजी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण तर्फे सुरु करण्यात आलेल्या ७ रस्त्यांच्या कामाबाबात मा. स्थायी समिती सभागृह येथे मा. आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली.

➢ **बैठकीच्या वेळी खालील ७ रस्त्यांच्या कामांबाबत चर्चा झाली, त्याचा तपशिल खालीलप्रमाणे :-**

१. उल्हासनगर-४ येथील नेताजी चौक ते कैलाश व्हाया कुर्ला कॅम्प पर्यंतच्या रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे.
२. उल्हासनगर -५ येथील न्यु इंग्लीश हायस्कुल ते लालचक्की चौक व्हाया पेट्रोल पंप आणि हिललाईन पोलीस स्टेशन पर्यंतच्या रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे.
३. उल्हासनगर- १ येथील ए ब्लॉक ते साईबाबा टेम्पल व्हाया डॉल्फीन क्लब ते सेंच्युरी ग्राउंड ते गुरुव्दारा पर्यंतच्या रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे.
४. उल्हासनगर- ४ येथील वाको कंपाउंड ते व्हीनस चौक (दुतर्फा नाली बांधणे) पर्यंतच्या रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे.
५. उल्हासनगर-४ येथील सोनार चौक ते कोयंडे पुतळा वाया शारदा कॅसेल पर्यंतच्या रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे.
६. उल्हासनगर-३ येथील हिराघाट टेंपल ते डर्बी हॉटेल व्हाया समर्पन अपार्टमेंट पर्यंतच्या रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे.
७. उल्हासनगर-३ येथील शामा प्रसाद मुखर्जी चौक ते शांतीनगर व्हाया विठ्ठलवाडी रेल्वे स्टेशन पर्यंतच्या रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे.

सदर ७ रस्त्यांची कामे महत्वाकांक्षी असून, सदर रस्त्यांच्या कामांकरीता मंजूर झालेल्या निधीचे विहीत मुदतीत विनियोग होणे आवश्यक आहे. याकरीता सहा. आयुक्त, नगररचना विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, पाणी पुरवठा विभाग यांनी वेळोवेळी मुंमप्रविप्रा (एमएमआरडीए) यांचेशी समन्वय साधून काम लवकरात लवकर पूर्ण होणेचे नियोजन करावे.

सध्या सणोत्सव जवळ येत आहे तसेच शहरात चालिया हा उत्सव सुरु आहे. नागरिकांच्या, वाहतुकीच्या सोईकरीता ७ रस्त्यांवरील खड्डे बुजवून रस्ते सुस्थितीत ठेवणेबाबत मुंमप्रविप्रा (एमएमआरडीए) यांनी योग्य ती दक्षता घ्यावी अशा सूचना मा. आयुक्त यांनी दिल्या.

सदर बैठकीस खालीलप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिका व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे श्री. अर्जुन कोरेगावर, अधिक्षक अभियंता (मुंमप्रविप्रा), डॉ. करुणा जुईकर, अतिरिक्त आयुक्त (सेवा), श्री.जमीर लेंगरेकर, अतिरिक्त आयुक्त (शहर), श्री. संदिप जाधव, शहर अभियंता, श्री. बुडगे, कार्यकारी अभियंता, (पापु), प्रभाग समिती क्र.४ व २ चे प्रभाग अधिकारी व इतर अधिकारी तसेच श्री. अमोल जाधव, उप अभियंता (मुंमप्रविप्रा), तसेच एम.एम.आर.डीए. चे संबंधित सल्लागार व ठेकेदार उपस्थित होते.

कल्याण अंबरनाथ रस्त्यावर उड्डाणपूल बांधण्याच्या कामाची डीपीआर तयार करण्यास कार्यकारी अभियंता, (मुंमप्रविप्रा) यांना सांगुन बैठक समाप्त करण्यात आली.

२७/७/२३

(छाया प्रकाश डांगळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत — योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.

१. पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२. सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका
   - सदरची प्रेस नोट उल्हासनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.